Marathwada Vishesh 23/11/2004

# सारा बिल्डर्सच्या गृहप्रकल्प योजनेचा तुळजापुरात शुभारंभ

<u>तुळजापूर दि. २२ /ता. प्र.</u>

स्थापत्य क्षेत्रातील नामवंत सारा बिल्डर्स अॅन्ड डेव्हलपर्स या कंपनीच्या वतीने तुळजापूर येथे गृह प्रकल्प योजनेचा शुभारंभ महंत तुकोजीबुवा यांच्या हस्ते नुकताच करण्यात आला.

यावेळी प्राथमिक शिक्षक संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष लालासाहेब मगर, बीड येथील विमा कंपनीचे अधिकारी ए. के. सय्यद, सिल्लोड येथील अभियंता कमलाकर जाधव, उस्मानाबाद येथील अभियंता खुरुद, बार्शी येथील बँक ऑफीसर प्रताप गायकवाड, नगर सेवक पंडीतराव जगदाळे, सारा बिल्डर्सचे मुख्य अभियंता अनिरुद्ध जोशी, श्री. वाहुळ आदी उपस्थित होते. या शुभारंभानंतर 'सारा'चे अनिरुद्ध जोशी यांनी नियोजित 'सारा वैभव' या गृहप्रकल्पाची माहिती दिली. या गृहप्रकल्पात 'ए' प्रकारातील १७ बंगले तर 'बी' प्रकारातील ४७ बंगले बांधण्यात येणार आहेत. शासकीय, निमशासकीय खाजगी परंतु कायम स्वरुपी नोकरीत असणाऱ्या नोकर वर्गाला कंपनीमार्फत 'गृहकर्ज' उपलब्ध करुन दिले जाणार आहे. या सारा वैभव कॉलनीत डांबरी रस्ते, अंतर्गत भुयारी गटार, पाणी मुलांसाठी उद्यान, कचराकुंडया, आदी मूलभूत सोयी उपलब्ध करुन दिल्या जाणार असून घराच्या सुरक्षिततेसाठी सुरक्षा भिंत बांधली जाणार आहे. तसेच संपूर्ण कॉलनीत वृक्षारोपण करण्यात येणार आहे. या बंगल्यांची किंमतही वाजवी ठेवण्यात आली असल्याचेही जोशी यांनी सांगितले 'सारा'च्या या योजनेचे शिक्षक संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष लालासाहेब मगर यांनी स्वागत करुन ग्रामीण भागात आधुनिक पद्धतीचे बांधकाम 'सारा' करीत असल्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले. यावेळी कुलस्वामीनी विद्यालयाचे कर्मचारी मोहनराव गायकवाड यांनी रोख शुल्क भरुन या गृहयोजनेच्या नोंदणीचा शुभारंभ केला.